**Journal of East-West Thought**
**ISSN: *2168-2259 (online)***
***(https://jetjournal.us/)***
**Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2**

JOURNAL OF EAST-WEST THOUGHT

**Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I**

# जैवविविधतेने नटलेला नागझिरा वन्यजीव अभयारण्य : पर्यटन व स्थानिक लोकांचा विकास

**शितल एन. साहू,** संशोधन अभ्यासक, एन. एच. कॉलेज, ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर
**डॉ. राजेंद्रकुमार ए. के. डांगे,** संशोधन मार्गदर्शक, भूगोल विभागाचे प्रमुख, एन. एच. कॉलेज, ब्रम्हपुरी जि. चंद्रपुर

**सारांश :**

"वनात भवति पर्जन्य: पर्जन्यात अन्नसंभव:।
अन्नस्य संभवात संपद तस्माद् वाणिज्यवर्धनम्॥
वाणिज्यात विविधोद्योगा: तस्मात् सृष्टेनिरामय ।
एतत्सर्वमसाध्यं हि वृक्षसंवर्धनं विना ॥"

**'वृक्ष आणि पर्यावरण'** मानवी जीवन विकास, सजीव सृष्टी यांचे अटूट नाते आणि जीवनश्रृंखला सांगणाऱ्या या सुभाषितातून पर्यावरण आणि मानवी जीवन यांचे सहसंबंध स्पष्ट होतांना दिसते. याचे अस्तित्व मानवाकरिता वन, पर्यावरण व जीवनचक्राला फार महत्वाचे आहे. अन्न, वस्त्र, निवारा, हवा, पाणी, जीवनावश्यक गरजा- पूर्तीचा ऊर्जास्त्रोत तसेच सजीव सृष्टीचा रक्षणकर्ता, पालनकर्ता म्हणजे वृक्ष होय. वृक्ष हे पर्यावरणातील अभिन्न अंग असून पर्यावरणाचा समतोल राखण्यात मोलाची कामगिरी बजावतात. असेच कार्य नागझिरा वन्यजीव अभयारण्य व त्यातील जैवविविधता आपले पर्यावरण व मानवी विकास यांचा समतोल राखण्यास मदत करते. जैवविविधतेने नटलेले अभयारण्य विदर्भाची हिरवे फुफ्फुसे म्हणून ओळखली जातात.

या अभयारण्यामध्ये नानाविध प्रकारचे पक्षी, प्राणी, फुलपाखरे, फुले, बहूगुणी वनस्पती, सरपटणारे प्राणी यांचे प्रजाती मोठ्या प्रमाणावर आढळतात. अश्या वैविध्यपूर्ण नटलेल्या वनसंपदामुळे मानव यांचा सुद्धा विकास होत आहे. यातून पर्यावरणाची कोणतीही हानी न पोहचता मानवाचा देखील श्वासत विकास व्हावा या उद्देशानातून निर्माण झालेले पर्यावरणीय पर्यटन हे मानवाचा आर्थिक विकास व पर्यावरणाचा समतोल राखण्यात मोलाची कामगिरी बजावतात. निसर्गाचे समतोल राखून मानवाचा विकास करणे हा पर्यावरणीय पर्यटनाचा मुख्य उद्देश आहे.

**प्रस्तावना :**

नागझिरा वन्यजीव अभयारण्यातील जैवविविधता खूप समृध्द आहे. "पृथ्वीवरील वैविध्यपूर्ण जीवन व तिच्या अगणित प्रक्रिया म्हणजे जैवविविधता होय." जैवविविधता ही सापेक्षदृष्ट्या नविन संकल्पना असून 'जैवविविध्य' हा शब्द सर्वप्रथम अमेरिकन संशोधकांनी १९८० च्या दशकामध्ये वापरला यामध्ये सुक्ष्म जंतूपासून, किटक, वनस्पती, पक्षी, मांसे सस्तन महाकाय प्राण्यांपर्यंत जटील बहूपेशीय जीवांचा समावेश होतो. यामध्ये जैविक व अजैविक घटकांचा समावेश करून एक परिसंस्था निर्माण होतो.


Copyright © | JET Network, All Rights Reserved


Journal of East-West Thought
ISSN: 2168-2259 (online)
(https://jetjournal.us/)
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

अशीच एक परिसंस्था, जैवविविधिता या नागझिरा वन्यजीव अभयारण्यामध्ये विपूल प्रमाणात दिसून येते. एकीकडे मानवाने केलेली उत्क्रांती, मानवाच्या भौतिक गरजा, जंगल तोडून शेतीचा विकास, वातानुकूलित घरे, कार्यालय इ. सोयीसुविधा निर्माण करण्यामागे मनुष्य गुंतत चालला आहे. मानवाचा विकास करतांना कुठेतरी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे, याचा मानवाला विसर पडला आहे. पर्यावरणाला डावलून मानव स्वत:चा विकास साध्य करू शकत नाही. म्हणून पर्यावरणातील समतोल राखून मानवाचा सुद्धा शाश्वत विकास करने हे मुख्य ध्येय असणे गरजेचे आहे.

**अभ्यास क्षेत्र (Study Area) :**

जैवविविधता आणि पर्यावरणीय पर्यटन आणि स्थानिक लोकांचा आर्थिक विकास यातील सहसंबंध यांचा अभ्यास करण्यासाठी नागझिरा वन्यजीव अभयारण्याची निवड करण्यात आली आहे. नागझिरा वन्यजीव अभयारण्य हे ३ जून १९७० रोजी महाराष्ट्र शासनातर्फे घोषित करण्यात आले. नैसर्गिक सौदर्याने नटलेल्या या अभयारण्यामध्ये कृत्रिम तलाव तसेच चोरखमारा व नागझिरा सारखे नैसर्गिक तलाव आहेत. विविध प्रकारची वनस्पती, प्राणी, पक्षी तसेच फुलेफळांनी बहरलेला नागझिरा वन्यजीव अभयारण्या विदर्भाचे गौरव आहे.

नागझिरा वन्यजीव अभयारण्य भंडारा व गोंदिया दोन्ही जिल्हांतर्गत येते. या अभयारण्याचा भौगोलिक विस्तार रेखांशीय विस्तार ७९° ५८' ते ८०° ११ ' पूर्व व अक्षांशीय विस्तार २१° १२' ते २१° २१' उत्तर आहे. हे अभयारण्य १५२.५८ चौ.कि.मी. क्षेत्रात विस्तारलेले आहे.




**उद्दिष्ट्ये :**

१) पर्यावरणाचा संतुलन राखणे व त्यावर अवलंबून असणाऱ्या जैवविविधतेचे संरक्षण व संवर्धन करणे.

२) जैवविविधतेबद्दल जनजागृती करून पर्यावरणीय पर्यटनाचा विकास करणे.

३) स्थानिक लोकांना अरण्याबद्दलचे महत्व सांगून त्यांचा सामाजिक व आर्थिक विकास साधने.

**अभ्यास पद्धती :**

प्रस्तुत शोध प्रबंधाकरिता मुख्यत: प्राथमिक व द्वितीयक माहितीचे संकलनाचा वापर करण्यात आला आहे. त्यामध्ये दैनिक बातमीपत्र, महाराष्ट्र शासनाची "Tiger Conservation Plan" 2020-21 to 2029-30, भंडारा व गोंदिया जिल्ह्यातील वनविभागातील विविध पुस्तके काही मासिके व आंतरजाल (Internet) इ. माहितीचा उपयोग केला गेला आहे.


Copyright © | JET Network, All Rights Reserved

**जैवविविधता आणि पर्यटन :**

मानवाच्या शाश्वत विकासासाठी निर्सगातील जैवविविधता जपणे व ती टिकवून ठेवणे ही आपली सर्वांची नैतिक जबाबदारी तर आहेच सोबतच आपल्या जीवनाचा अविभाज्य अंग आहे. आपल्या सभोवतालच्या परिसंस्था, पर्यावरण, जनुकीय, विविधता, वंश व जातींमधील विविधता आणि जैविक संस्थांमधील विविधतेमुळे आपल्याला आवश्यक अन्न, लाकूड, धागे, ऊर्जा, कच्चा माल, खनिजे, धातू आणि औषधे यांचा साठा प्राप्त होतो.

या अभयारण्यामध्ये जैवविविधता मुबलक प्रमाणात आढळून येते. ते खालील तक्त्याद्वारे दर्शविले आहे.

| वनस्पती वर्गीकरण | वनस्पती प्रजाती | प्राण्यांचे वर्गीकरण | प्रजाती |
|---|---|---|---|
| वृक्षवर्गीय | १२४ | सस्तन प्राणी | ३८ |
| झुडूपवर्गीय | ३८ | पक्षीवर्गीय | २०२ |
| वेलवर्गीय | ३२ | सरपटणारे प्राणी | ३६ |
| गवत | २८ | फुलपाखरे | ४९ |
| फुलवर्गीय | ०२ | मत्सवर्गीय | ५२ |
| औषधीवर्गीय | ९१ | | |
| बांबुवर्गीय | ०२ | | |
| ताड | ०४ | | |
| परजीवी | ०२ | | |

**अधिवासावर आधारीत प्राण्यांचे वर्गीकरण :**

| अधिवास प्रकार | प्रजाती |
|---|---|
| जलचर | मासे, पानकावळा, ससाना, जळू, साप, |
| उभयचर | बेडूक, कासव, पानकावळा, ढोकरी, करकोचा, पानकोंबळी, कोतवाल |
| खेचर | मोर, घुबड, रानबदक, पानकोंबळी, वटवटे, चांदी, टिबूकली |
| भूचर | हरिण, वाघ, बिबट्या, निलगाय, सांभर, रानकुत्रा, रानडुक्कर, अस्वल, कोल्हा |
| वृक्षचर | माकड, सरडा, साप, खार, अजगर, घुबड |

सागवन, चिंच, बोर, हिरडा, बेहडा इ. सारख्या वनस्पती, मनाला आकर्षित करणारे विविध फुलपाखरे, वर्ष २०२४ मध्ये झालेल्या तीन दिवसीय सर्वेक्षणामध्ये ८० नविन फुलपाखरांचा प्रजातीचा शोध घेण्यास निसर्गप्रमींना यश आले वाघ, बिबट्या निलगाय, कोल्हे, हरिण, सांबर, काळवीट, उदमांजर, अस्वल, कोकड, जंगली कुत्रे, रानडुक्कर, मुंगूस, उंदिर, रानगवा-चौसिंगा, माकड इ. प्राणी तसेच मोर, घुबड, घार, पोपट, कबूतर, डोमकावळा, इ. पक्षी तसेच स्थलांतरीत पक्षी, अजगर, रसेल वायपर, किंगकोबरा, धामन, सतरंज्या आणि घोरपड इ. सरपटणारे प्राणी यांचे नंदनवन आहे.

मनमोहक सुंदरता, नागझिरा तलाव, झुळझुळ वाहणारे झरे, पक्ष्यांची किलबिलाट या सर्व नैसर्गिक सौंदर्यामुळे नागझिरा हे पर्यटकांचे खास आकर्षणाचे केंद्र बनले आहे. त्यामूळे याठिकाणी पर्यटक, निसर्गप्रेमी,


Copyright © | JET Network, All Rights Reserved

Journal of East-West Thought
ISSN: *2168-2259 (online)*
*(https://jetjournal.us/)*
Volume 15, Issue 1, Jan-March – 2025 Special Issue 2
JOURNAL OF EAST-WEST THOUGHT
Impact Factor: 7.665, Peer Reviewed and UGC CARE I

संशोधक, मोठ्या प्रमाणात वनभ्रमंती करतांना दिसुन येतात. जंगल भ्रमंती करण्याकरीता पिटेझरी व चोरखमारा असे मुख्य दोन गेट आहेत. पर्यटनाचा आनंद आपल्याला खुल्या जिप्सीद्वारे घेता येतो. तसेच दरवर्षी शरद पोर्णिमेच्या दिवशी प्राण्यांची गणना केली जाते. मोठ्या प्रमाणावर निसर्गप्रेमी प्राणीगणना व ट्रेकिंगकरिता उत्सर्फुतपणे भाग घेत असतात.

**नागझिरा वन्यजीव अभयारण्यामध्ये भ्रमंती करण्याचा कालावधी व वेळ :**

| Period | Morning | Evening |
|---|---|---|
| 1st Oct. to 30th Nov. | 6.00 am – 10.00 am | 2.30 pm – 6.00 pm |
| 1st Dec. to 28/29 Feb | 6.30 am – 11.00 am | 2.00 pm – 6.00 pm |
| 1st Mar to 30th April | 5.30 am – 10.00 am | 3.00 pm – 6.30 pm |
| 1st May to 30th June | 5.00 am – 9.30 am | 3.30 pm – 7.00 pm |
| 1st July to 30th Sept. | Closed | Closed |

**प्रवेश द्वार :-**

| Entry | Gate |
|---|---|
| Nagzira | Mangezari, Chorkhamara Gate 1<br>Chorkhamara Gate 2<br>Pitezari Gate |
| New Nagzira | Chorkhamara Gate 1<br>Chorkhamara Gate 2<br>Umarzari Gate |

**नागझिरा वन्यजीव अभयारण्य आणि स्थानिक लोकांचा विकास :**

या अभयारण्याच्या आजूबाजूच्या गावांमध्ये मोठ्या प्रमाणात गोंड लोकांची वस्ती दिसून येते. पुर्वीच्या काळी हे गोंड लोक शिकार करून आपली उपजिविका करीत असत परंतू शासनाच्या धोरणे व योजना यामुळे शिकारीवर बंदी घालण्यात आली आहे. त्यामुळे गोंड आदिवासी लोकांनी आपली उपजिविका अभयारण्यातील औषधी वनस्पती, फुले, फळे, मध, डिंग, राळ यासारख्या वनोत्पादन तसेच बांबूपासून चटया, टोपल्या व शोभेच्या वस्तू बनवून बाजारात विकून करतात.

जंगल भ्रमंती करीता अनिवार्य असलेली जिप्सी काही स्थानिक लोकांची उपजिविकेचे साधन बनली आहेत. तसेच टुरिस्ट गाईडची निवड तेथील स्थानिक लोकांमधून केली जाते. त्याचबरोबर गावातील महिलांनी सुद्धा पारंपारिक हस्तकला सादर करून कापडी पिशव्या, पर्स, बॅग यासारख्या वस्तूंवर पारंपारीक कलाचित्र काढून त्या टुरिस्ट लोकांना विकून रोजगारीचे साधन बनविले आहे. काही स्थानिक लोकांनी घरी हॉटेल्स, रिसॉर्ट बांधून पर्यटकांसाठी खाण्यापिण्याची व राहण्याची सोय करून रोजगार वाढविला आहे. तसेच


Copyright © | JET Network, All Rights Reserved

गावाच्या आजूबाजूला मोठ्या प्रमाणात शेतीसुद्धा केली जाते. संपूर्ण गावामध्ये काँक्रीट रस्ते, बोरवेल्स, प्राथमिक जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्र (PHC) यासारख्या सोयी सुविधांमुळे गावाचा आर्थिक व सामाजिक विकास झाला आहे.

**निष्कर्ष :**

एकंदरीत या अभयारण्यातील जैवविविधता, नैसर्गिक सौंदर्याने नटलेला जंगल, नैसर्गिक तलाव पशु, पक्षी व वनस्पतीचे विविधता अशा वैविध्यपूर्ण अभयारण्याचे संरक्षण, संवर्धन करणे, पर्यावरणीय पर्यटनाचा विकास करणे तसेच स्थानिक लोकांचा आर्थिक विकास यामूळे नागझिरा वन्यजीव अभयारण्य हे विदर्भरूपी मुकूटामध्ये कोहीनूर हिराच आहे.

**संदर्भसूची :**

१) लहाडे, नंदा संजय – “पर्यटन भूगोल” – चेतक बुक्स प्रकाशन, पुणे.
२) डॉ. नागतोडे, डॉ. पारधी – “पर्यटन भूगोल” – विद्या प्रकाशन, नागपूर.
३) पुरंदरे, किरण – “सखा नागझिरा” – निसर्गवेध प्रकाशन, सदाशिव पेठ, पूणे.
४) Govt. of Maharashtra – “Tiger Conservation Plan” 2020-21 to 2029-30
५) Dr. A.P. Dudhbhure – Nagzira Wildlife Sanctuary : Green Lungs of Vidarbha – International Journal of Advance and applied research – ISSN -2347-7075
६) https:/en.wikipedia.org/wiki/Nagzira
७) सांगळे, शैलेजा – “पर्यटन भूगोल” – डायमंड प्रकाशन, पुणे.
८) डॉ. घारपूरे, विठ्ठल – “जैविक भूगोलशास्त्र” – पिंपळापूरे न्ड कं. पब्लिशर्स, नागपूर


Copyright © | JET Network, All Rights Reserved